**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४०/२०१६</u>**

(इर्शाद अहमद मोहद्दीन शेख विरुध्द अहमद इब्राहीम खान)

**:– नि. ३० खालील आदेश –:**

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी अहमद इब्राहीम खान हे दिनांक ०७/१२/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी यास १अ. सिराजबी अहमद खान, १ब. हसन अहमद खान, १क. अफताफ अहमद खान, १ड. मुनीरा अन्वर शेख, १इ. फिरोज अहमद खान, १फ. परवीन अहमद खान व १ज. रेश्मा अहमद खान हे वारस आहेत. या व्यतिरिक्त आणखी कोणीही वारस नाहीत. मध्यतरीच्या काळात वादी हे काविळीच्या आजाराने त्रस्त असल्याने त्यांना पुर्णपणे अशक्तपणा आलेला असल्याने त्यांना हिंडता फिरता येत नव्हते. त्यामुळे मयत प्रतिवादी यांचा मृत्यु दाखला व वारसांबाबतची तजविज वादी यांना मुदतीत म्हणजेच ९० दिवसांचे कालावधीत दाखल करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे वारस दाखल करणेस १३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंबामागे वादी यांचा कोणताही निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणा नाही. सबब, प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल न केल्याने प्रतिवादी यांचेविरुध्द दावा अबेट झालेला आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादीने सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार

मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

०५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी अहमद इब्राहीम खान हा दिनांक ०७/१२/२०२२ रोजी कुडाळ येथे मयत झाला आहे. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीचा बळकावलेला कब्जा परत मिळणेसाठी, कायमची व अज्ञार्थी ताकिद होणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला होता. सदरचा विलंब हा नि. २९ च्या आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. प्रतिवादीचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर आणण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी व न्यायालयाचा वेळ खर्ची झाल्याने वादी यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. नि. ३० कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादीला रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/-

दिनांक– १२/०३/२०२४

(प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.